(५)

# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

Email : vdodehu@gmail.com

जा.क्र आस्था/ ५०१/२०२२-२३

दि. २२/०८/२०२२

## सर्वसाधारण सभा

**नमुना 'अ' (नियम ३ पहा)**

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा **वार सोमवार दिनांक.२९/०८/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता** नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे.

**नमूद 'अ' चे जोडपत्र**

**देहू नगरपंचायतीची सोमवार दिनांक.२९/०८/२०२२ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाज.**

**सभेपुढील विषय .**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

३) देहू नगरपंचायत हद्दीतील दिव्यांगांना ५% टक्के निधीतून रोख रक्कम देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४) देहू नगरपंचायत स्थायी समिती दि.०४/०५/२०२२ व दि.२४/०८/२०२२ सभेतील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५) देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती सभा दि.३०/०६/२०२२ विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६) देहू नगरपंचायत कोव्हीड -१९ काळातील बिले अदा करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

७) देहू नगरपंचायत हद्दीतील सुतार आळी येथे पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी गटार करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

८) नदी घाटावर भाविकांसाठी मोबाईल टॉयलेट बसवणेबाबत वार्षिक निविदा करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

९) देहू नगरपंचायत हद्दीतील आवश्यकतेनुसार हॅण्ड पंप दुरुस्ती करणे विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१०) विद्युत व इतर विभागाकरिता लागणाऱ्या वाहनासाठी इंधन व वाहन दुरुस्ती साठी वार्षिक निविदा करणे विचार विनिमय करून निर्णय घेणे.

११) अस्थी विसर्जनासाठी व निर्माल्य टाकणासाठी नदी घाट परिसारत अस्थी /निर्माल्य कुंड उभारनेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

१२) देहू नगरपंचायत चव्हाण नगर येथील पाईप लाईन कामाचे झालेला अतिरिक्त खर्चास मान्यता
बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१३) देहू नगरपंचायत हद्दीतील जुन्या झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईनचा आधुनिक पद्धतीने
सर्वे करून घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१४) देहू नगरपंचायत हदीतील सरकारी गायरान विठ्ठलवाडी येथील पिण्याच्या पाण्याचा टाकीला
वॉल कंपाऊंड करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१५) देहू नगरपंचायत हदीतील महाराष्ट्र जिवन प्राधिकरण काळात बंद केलेल्या नळ कनेक्शन धारकांची
पाणीपट्टी कमी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१६) देहू नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्र.१६ मधील सावतामाळी मंदिर शेजारील जुन्या लाईनचे
कनेक्शन करणे व त्या अनुषंगिक कामे करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१७) देहू नगरपंचायत हद्दीतील शाळेभोवती, मंदिर परिसरातील तसेच वाढलेले गवत कमी करणे
तणनाशक फवारणी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१८) देहू नगरपंचायत सरकारी गायरान हद्दीत व्यक्ती व प्राणी यांच्या डेड बॉडी दफन करणेसाठी
करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

सौ.स्मिता चव्हाण
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

१७

# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

**Email** : vdodehu@gmail.com

जा.क्र आस्था/624 /२०२२-२३

दि. १९/०९/२०२२

## तहकूब सर्वसाधारण सभा

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची दि.२९/०८/२०२२ रोजीची गणपूर्ती अभावी तहकुब झालेली सर्वसाधारण सभा **वार शुक्रवार दि. २३/०९/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता** देहू नगरपंचायत कार्यालय सभागृहात होणार आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे हि विनंती.

सौ.स्मिता चव्हाण
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

Email : vdodehu@gmail.com

जा.क्र आस्था/ ५०१/२०२२-२३

दि. २२/०८/२०२२

## सर्वसाधारण सभा

नमुना 'अ' (नियम ३ पहा)

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा वार सोमवार दिनांक.२९/०८/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे.

नमूद 'अ' चे जोडपत्र

देहू नगरपंचायतीची सोमवार दिनांक.२९/०८/२०२२ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाज.

सभेपुढील विषय .

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

३) देहू नगरपंचायत हद्दीतील दिव्यांगांना ५% टक्के निधीतून रोख रक्कम देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

×४) देहू नगरपंचायत स्थायी समिती दि.०४/०५/२०२२ व दि.२४/०८/२०२२ सभेतील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५) देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती सभा दि.३०/०६/२०२२ विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६) देहू नगरपंचायत कोव्हीड -१९ काळातील बिले अदा करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

×७) देहू नगरपंचायत हद्दीतील सुतार आळी येथे पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी गटार करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

८) नदी घाटावर भाविकांसाठी मोबाईल टॉयलेट बसवणेबाबत वार्षिक निविदा करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

९) देहू नगरपंचायत हद्दीतील आवश्यकतेनुसार हॅण्ड पंप दुरुस्ती करणे विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१०)विद्युत व इतर विभागाकरिता लागणाऱ्या वाहनासाठी इंधन व वाहन दुरुस्ती साठी वार्षिक निविदा करणे विचार विनिमय करून निर्णय घेणे.

११)अस्थी विसर्जनासाठी व निर्माल्य टाकणासाठी नदी घाट परिसारत अस्थी /निर्माल्य कुंड उभारनेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

१२)देहू नगरपंचायत चव्हाण नगर येथील पाईप लाईन कामाचे झालेला अतिरिक्त खर्चास मान्यता बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१३)देहू नगरपंचायत हद्दीतील जुन्या झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईनचा आधुनिक प सर्वे करून घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१४)देहू नगरपंचायत हदीतील सरकारी गायरान विठ्ठलवाडी येथील पिण्याच्या पाण्याचा टाकीला वॉल कंपाऊंड करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१५)देहू नगरपंचायत हदीतील महाराष्ट्र जिवन प्राधिकरण काळात बंद केलेल्या नळ कनेक्शन धा पाणीपट्टी कमी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१६)देहू नगरपंचायत हद्दीतील वार्ड क्र.१६ मधील सावतामाळी मंदिर शेजारील जुन्या लाईनचे कनेक्शन करणे व त्या अनुषंगिक कामे करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१७)देहू नगरपंचायत हद्दीतील शाळेभोवती, मंदिर परिसरातील तसेच वाढलेले गवत कमी करणे तणनाशक फवारणी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१८)देहू नगरपंचायत सरकारी गायरान हद्दीत व्यक्ती व प्राणी यांच्या डेड बॉडी दफन करणेसाठी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

सौ.स्मिता चव्हाण
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.१ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे

ठराव क्र.१ :- सदरचा विषयानुसार मागील सर्वसाधारण सभेमधील पारित झालेल्या ठरावावर विचार विनिमय करण्यात आला असता खालील मुद्यावर चर्चा करण्यात आली.

- ई सेवा केंद्र १ महिना होऊन गेला तरी अजून जागा खाली करण्यात आली नाही यावर काय निर्णय झाला असा प्रश्न प्रविण काळोखे यांनी सभागृह मांडला असता
- *त्यावर जुनी ग्रा,प.आहे त्या ठिकाणी ई सेवा केंद्र करता येईल यासाठी गाळयांचे इस्टीमेट करण्याचे काम चालू आहे तो पर्यत राहू दया आसे मत मुख्याधिकारी यांनी मांडले.
- १ तारीख देण्यात यावी त्यावेळी ती जागा खाली करण्यात यावी. -प्रविण काळोखे
- जी जागा दिली ती नागरिकांच्या सोयी साठी दिली पण तसे होतच नाही. ते बंद आहे नगरपंचायतने स्वतःचे सुरु करावे –योगेश परंडवाल
- ज्यासाठी जागा घेतली त्यासाठी वापर होत नाही ती खाली करण्यात यावी.नगरपंचायत मार्फत आधार सुरु करावे-पोर्णिमा परदेशी
- एक नोटीस काढण्यात यावी ई सेवा केंद्र यांना
- एक मशीन नगरपंचायत मार्फत घेऊ त्यासाठी कलेक्टर ऑफिसला पत्रव्यवहार करावा.
- नगरसेवकांकडे तक्रारी आहेत दुप्पट दराने आकारणी करून रक्कम आकारली जात आहे- योगेश परंडवाल
- कलेक्टर ऑफिसला अर्ज करून मशीन मागणी करावी.-योगेश काळोखे.
- मारुती मंदिराचे पुढील पत्रे बदलणे.व वरच्या हॉलला कलर करून देणे.८दिवसत करणे.
- ८ दिवसात ई सेवा केंद्र काढून घेणे नोटीस देणे.
- दसऱ्यापर्यंत सदस्यांच्या नावाचे बोर्ड लावण्यात यावे .

मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

सुचक :- सौ.पूनम विशाल काळोखे
अनुमोदक :- श्री.योगेश बाळासाहेब परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

देहू नगरपंचायत

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.२ :- मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

ठराव क्र.२ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला मा. नगरसेवक यांनी मिटिंगला सलग सहा महिने गैरहजर राहिल्यास त्यांचे नगरसेवक पद रद्द होऊ शकते.त्यासाठी एखादा नगरसेवक अथवा नगरसेविका यांना दीर्घकाळ रजेवर रहावयाचे असल्यास त्यांनी मा. नगराध्यक्षा यांच्या कडे रजेचा अर्ज देवून तो मंजूर करून घेऊन रजेवर जाता येते याबद्दल ची माहिती मा.मुख्याधिकारी यांनी सभागुहात दिली.

तरी कोणत्याही सदस्याचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत .

सुचक :- प्रियांका अभिजित मोरे
अनुमोदक :- पूजा सुमित काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.३ :- देहू नगरपंचायत हद्दीतील दिव्यांगांना ५% टक्के निधीतून रोख रक्कम देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.३ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.देहू नगरपंचायत हद्दीतल एकूण ९३ दिव्यांना असुन नगरपंचायतीच्या एकूण उत्पन्नाच्या ५% निधी हा दिव्यांग व्यक्तीवर खर्च करावयाचा असुन सन २०२१-२०२२ नगरपंचायत अर्थसंकल्प तरतूदी मधील शिल्लक ५% निधी थेट लाभार्थ्यांला रोख स्वरूपात रक्कम न देता बँक खात्यात वर्ग करणे. तसेच मागील सन २०२०-२१ चे देण्यात यावे म्हणून सभागृहाने मान्यता दिली.

तसेच माळीनगर, कॉन्टोंमें हद्दीतील ज्याच्याबद्दल संभ्रम आहे.त्यांची देहू नगरपंचायत यांनी कॉन्टोंमेंट प्रशासकांशी पत्रव्यवहार करून पुढील कार्यवाही करावी अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- प्रविण रामदास काळोखे
अनुमोदक :- मयूर दत्तात्रय शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.५ :- देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती सभा दि.३०/०६/२०२२ विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत महिला व कल्याण विभागामार्फत विषय घेण्यात आले असता त्यावर खलीलप्रमाणे सविस्तर चर्चा करण्यात आली.

**विषय क्र.१:-** देहू शहरातील महिलांच्या विकासासाठी लघु उद्योग व प्रशिक्षण शिबीर आयोजित करणेबाबत विषय मांडण्यात आला असता संपूर्ण देहू शहरातील महिलांच्या विकासासाठी विविध प्रकारची लघु उद्योग करणेकामी ५ लाख पर्यत प्रशिक्षण शिबिरे घेण्यात यावी जेणेकरून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

विषय क्र.२:- देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण विभागामार्फत देहू शहरातील शाळांमध्ये वेडिंग मशीन बसणे बाबत विषय मांडण्यात आला असता, देहू शहरातील शाळांमध्ये वेडिंग मशीन बसवण्यात यावे व त्याची देखभाल दुरुस्तीसाठी त्या त्या शाळांना त्याची जबाबदारी देण्यात यावी. त्या करिता शाळांना पत्र द्यावे व त्यांची ना- हरकत असल्यास वेडिंग मशीन लावण्यात यावे.

विषय क्र.३ :- देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण विभागामार्फत देहू शहरात बाल लैंगिक शोषणा बाबत जनजागृती मोहीम राबवणेबाबत विषय सभेत मांडण्या आला असता, देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण विभागामार्फत दि. १६/०८/२०२२ रोजी संत तुकाराम मंगल कार्यालय येथे बाल लैंगिक शोषणा बाबत जनजागृती विषयी कार्यक्रम घेण्यात आला असता त्यालादेहूतील महिला व मुलींचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे शहर परिसरात बाल लैंगिक शोषणा बाबत जनजागृती करणे गरजेचे असल्याचा प्रतिसाद महिला व मुलींचा आला.तसेच महिलांचं मागणीनुसार शहरात महिलांच्या स्वावलंबी बनवण्यासाठी देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण विभागामार्फत मसाले बनवणे,शिवणकामाचे,पार्लर, अरीवर्क तसेचे आरोग्याचा साठी योगा क्लास व इतर मागणीनुसार आवश्यक लघुउद्योग शिबिरे गरजेचे आहे. तरी सदर कामा करिता अंदाजे रक्कम रु.५,०००००/- रु खर्च येणार आहे. अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सपना जयेश मोरे

अनुमोदक :- पोर्णिमा विशाल परदेशी

ठराव सर्वानुमते मंजूर

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.५ :- देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण समिती सभा दि.३०/०६/२०२२ विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.

देहू नगरपंचायत महिला व कल्याण विभागामार्फत विषय घेण्यात आले असता त्यावर खलीलप्रमाणे सविस्तर चर्चा करण्यात आली.

**विषय क्र.१:-** देहू शहरातील महिलांच्या विकासासाठी लघु उद्योग व प्रशिक्षण शिबीर आयोजित करणेबाबत विषय मांडण्यात आला असता संपूर्ण देहू शहरातील महिलांच्या विकासासाठी विविध प्रकारची लघु उद्योग करणेकामी ५ लाख पर्यत प्रशिक्षण शिबिरे घेण्यात यावी जेणेकरून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

विषय क्र.२:- देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण विभागामार्फत देहू शहरातील शाळांमध्ये वेडिंग मशीन बसणे बाबत विषय मांडण्यात आला असता, देहू शहरातील शाळांमध्ये वेडिंग मशीन बसवण्यात यावे व त्याची देखभाल दुरुस्तीसाठी त्या त्या शाळांना त्याची जबाबदारी देण्यात यावी. त्या करिता शाळांना पत्र द्यावे व त्यांची ना- हरकत असल्यास वेडिंग मशीन लावण्यात यावे.

विषय क्र.३ :- देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण विभागामार्फत देहू शहरात बाल लैंगिक शोषणा बाबत जनजागृती मोहीम राबवणेबाबत विषय सभेत मांडण्या आला असता, देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण विभागामार्फत दि. १६/०८/२०२२ रोजी संत तुकाराम मंगल कार्यालय येथे बाल लैंगिक शोषणा बाबत जनजागृती विषयी कार्यक्रम घेण्यात आला असता त्यालादेहूतील महिला व मुलींचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे शहर परिसरात बाल लैंगिक शोषणा बाबत जनजागृती करणे गरजेचे असल्याचा प्रतिसाद महिला व मुलींचा आला.तसेच महिलांचं मागणीनुसार शहरात महिलांच्या स्वावलंबी बनवण्यासाठी देहू नगरपंचायत महिला व बालकल्याण विभागामार्फत मसाले बनवणे,शिवणकामाचे,पार्लर, अरीवर्क तसेचे आरोग्याचा साठी योगा क्लास व इतर मागणीनुसार आवश्यक लघुउद्योग शिबिरे गरजेचे आहे. तरी सदर कामा करिता अंदाजे रक्कम रु.५,०००००/- रु खर्च येणार आहे. अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सपना जयेश मोरे

अनुमोदक :- पोर्णिमा विशाल परदेशी

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब,देहू नगरपंचायत कार्यालय,देहू

विषय क्र ६ - देहू नगरपंचायत कोव्हिड १९ काळातील बिले अदा करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेण्याबाबत.

ठराव क्र ६ - सदरचा विषय सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला कि, देहू नगरपंचायत हद्दीमध्ये कामगार वर्ग व शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असून माहे मार्च २०२१ मध्ये कोव्हीड आजाराची रुग्णसंख्या झपाट्याने वाढत होती. राज्यामध्ये कोव्हीड विषाणूच्या प्रादुर्भावामुळे पसरलेली रोगराई नियंत्रित करण्याची आवश्यकता असल्याने विलगीकरण कक्ष स्थापन करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी सो. यांनी जि.का.आ.व्य/कावि-२१२/२०२१ दि-१२/०३/२०२१ रोजी आदेश देण्यात आले होते. या आदेशाने तसेच गावातील कोरोनाच्या वाढता प्रादुर्भावामुळे व ग्रामस्थांच्या वाढत्या मागणीमुळे देहू नगरपंचायत प्रशासन मार्फत दि-०५/०४/२०२१ रोजी पासून वैकुंठ गमन मंदिर येथील भक्त निवास येथे १०० बेड असलेले कोव्हीड केअर सेंटर सुरु करण्यात आले. देहू नगरपंचायत ही नवनिर्मित असल्यामुळे तांत्रिक मनुष्य बळ उपलब्ध नसल्याने कोव्हीड केअर सेंटर सुरु करताना निविदा प्रक्रिया करणे तांत्रिक दृष्ट्या अडचणीचे होते तसेच वेळ ही खूप लागणार असल्याने स्थानिक ग्रामस्थांकडून कोव्हीड केअर सेंटर साठी अत्यावश्यक लागणाऱ्या गोष्टी साठी कोटेशन मागवून त्यांच्या कडून कामे करून घेण्यात आली.सदर कोव्हीड सेंटर सुरू करताना सुरक्षेच्या दृष्टीने मंडप व बॅरेगेटींग करून बंधिस्त करण्यात आले होते. रुग्णांना सूचना देण्यासाठी साऊंड सिस्टम लावण्यात आलेली होती. तसेच कोव्हीड केअर सेंटर स्वच्छतेसाठी लागणारे फिनेल, झाडू, ॲसिड , डस्टबिन व इतर अत्यावश्यक साहित्य घेण्यात आले होते. डॉक्टरांसाठी PPE किट, हॅंडग्लोज, मास्क , टोपी, शूपड इत्यादी घेण्यात आले होते. कोव्हीड केअर सेंटर साठी लागणारी संपूर्ण स्टेशनरी घेण्यात आले होती. रुग्णांना अल्पोपहार,भोजन, चहा यांची सोय करण्यात आलेली होती. तसेच PPE किट, हॅंडग्लोज, मास्क व इतर साहित्यांची विल्हेवाट लावण्यासाठी बायोमेडिकल व्येस्टेज ची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच कोव्हीड केअर सेंटर पाणी वापरासाठी असलेली बोअरवेल मोटर खराब झाल्यामुळे निविन मोटर बसवण्यात आली होती.

Scanned with OKEN Scanner

संपूर्ण कोव्हीड केअर सेंटर दिनाक ०५/०४/२०२२ ते ३१/०७/२०२२ पर्यंत सुरू होत. याकालावधित भोजन व्यवस्था पुरवण्याचे काम संजीवनी महिला बचत गट, मंडप व्यवस्था मुलाणी साऊंड सर्व्हिस, स्टेशनरी हाउसस्किपिंग साहित्य आरोग्य साहित्य वैष्णवी ट्रेडर्स, कोव्हीड केअर सेंटर मधील बायोमेडिकल वेस्ट दिस्पोज करणे कामी लाईफ सेक्युर एन्टरप्रीसेस, नवीन बोअरवेल मोटर्स बसवणे व पाण्याची लाईन टाकणे S.K. इंटरप्रीसस यांनी कामे केले असून त्यांना कोणत्याही प्रकारचे बिल अदा करण्यात आलेले नाही. सदरचे बील अदा करणे कामी त्यांनी केलेल्या कामाची बिले खालील प्रमाणे –

१)संजीवनी महिला बचत गट :

| अ | महिना | रक्कम रु |
|---|---|---|
| 1 | मे २०२१ | 3,44,058/- |
| 2 | जुन२०२१ | 2,33,159/- |
| 3 | जुलै२०२१ | 1,10,570/- |
| | एकूण = | 6,87,787/- |

२) मुलाणी साऊंड सर्व्हिस:

| अ | महिना | रक्कम रु |
|---|---|---|
| 1 | एप्रिल २०२१ | 20,800/- |
| 2 | मे २०२१ | 20,800/- |
| 3 | जुन२०२१ | 20,800/- |
| 4 | जुलै२०२१ | 20,800/- |
| | एकूण = | 82,200/- |

३) वैष्णवी ट्रेडर्स :

| अ | महिना | रक्कम रु |
|---|---|---|
| 1 | जुलै २०२१ | 1,46,319/- |
| | एकूण = | 1,46,319/- |

Scanned with OKEN Scanner

४) लाईफ सेक्युर एन्टरप्रीसेस :

| अ | महिना | रक्कम रु |
|---|---|---|
| 1 | एप्रिल २०२१ | 14,540/- |
| 2 | मे २०२१ | 14,971/- |
| 3 | जुन २०२१ | 13,830/- |
| 4 | जुलै २०२१ | 12,672/- |
| | एकूण = | 56,013/- |

५) S.K. इंटरप्रीसेस :

| अ | महिना | रक्कम रु |
|---|---|---|
| 1 | जून २०२१ | 12,700/- |
| | एकूण = | 12,700/- |

यावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली.वरील प्रमाणे कोव्हिड १९ काळातील बिल अदा करणे बाबत सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. ठराव प्रशासकीय व वित्तीय दृष्ट्या मान्य सर्वानुमते मंजूर.

R.S. KALOKHE

सूचक - सौ. रसिका स्वप्निल काळोखे

Pkalokhe

अनुमोदक - श्री. प्रवीण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा

देहू नगरपंचायत, देहू

स्थायी समिती सभा दिनांक - २३/०९/२०२२

Scanned with OKEN Scanner

# मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ७- देहू नगरपंचायत हद्दीतील सुतार आळी येथे पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी गटार करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्रं. ७- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत श्री शरद काळोखे व श्री मुंढे यांचे निवासासमोर असलेल्या काँक्रिटीकरण रस्त्यावरील चढामुळे पावसाचे पाणी एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे. त्यामुळे सदर परिसरातील नागरिकांकडुन वारंवार सदर पावसाचे पाणी साच त असल्यामुळे डासांचे प्रमाण वाढणे, दुर्गंधी पसरणे अशा विविध स्वरुपाच्या तक्रारी नगरपंचायत कार्यालयास प्राप्त होत आहेत.

त्याअनुषंगाने देहू नगरपंचायत कार्यालयाकडुन प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता त्या टिकाणी श्री शरद काळोखे व श्री मुंढे यांचे निवासपासून ते रामोशी मोरी पर्यंत पावसाचे पाणी निचरा होण्यासाठी सदर ठिकाणी नवीन गटारलाईन करणे आवश्यक आहे.यासाठी नगरपंचायतीमार्फत सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सक्षम प्राधिकरण यांचे तांत्रिक मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

सदर परिसरातील नागरिकांकडुन प्राप्त होणा-या तक्रारींचा विचार करुन अंदाजपत्रकाप्रमाणे सदर ठिकाणचे कामकाज पुर्ण करण्यासाठी व या कामी होणाऱ्या आर्थिक खर्चास या ठरावान्वये प्रशासकीस व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - श्री प्रविण काळोखे

अनुमोदक - सौ. प्रियंका मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,
देहू नगरपंचायत, देहू
सर्वसाधारण सभा दिनांक २९/०८/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.८ :- नदी घाटावर भाविकांसाठी मोबाईल टॉयलेट बसवणेबाबत वार्षिक निविदा करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.८ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला असता इंद्रायणी नदी घाटासमोरील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करून घेण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.तसेच देहू ही श्री.संत तुकाराम महाराजांची जन्म भूमी असल्याने येथे वर्षातून तीन (आषाढी यात्रा, कार्तिकी यात्रा ,संत तुकाराम महाराज बीज सोहळा) मोठ्या यात्रा भरत असतात तसेच जसे भारताचे पंतप्रधान मोदीसाहेब यांचा अचाकन झालेला दौरा, आणि जगद्गुरू श्री.संत तुकाराम महाराज यांचा जन्म उत्सव सोहळा व इतरही संस्कृती कार्यक्रम होत असतात.

तरी आषाढी यात्रा, कार्तिकी यात्रा ,संत तुकाराम महाराज बीज सोहळा या काळात राज्यातून व परराज्यातील हजारो भाविक भक्त येत असतात त्यासाठी नदी घाट परिसरात त्यांच्या आरोग्याच्या मोबाईल टॉयलेट बसवणे आवश्यक असतात त्यासाठी आषाढी ,कार्तिकी वारी व पालखी काळात नदी घाट परिसर,मुख्य मंदिर परिसर ,वैकुंठ मंदिर परिसर व इतर आवश्यकतेनुसार आवश्यक / मागणीनुसार ५० ते ६० मोबाईल टॉयलेटची आवश्यकता असते. जेणेकरून येणाऱ्या भाविक भक्त व वारकरी यांच्या सेवेसाठी व त्याच्या आरोग्यासाठी व शहरात घाणीचे साम्राज्य कमी होणेसाठी व रोगराईचे प्रसाराला आळा घालणे कामी व शहराच्या स्वच्छतेसाठी नदी घाटावर परिसरात मोबाईल टॉयलेट बसवणे गरजेचे आहे. सदर कामा करिता अंदाजे रक्कम रु.१०,०००००/- रु खर्च येणार आहे.अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक :- सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते नामंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.९ :- देहू नगरपंचायत हद्दीतील आवश्यकतेनुसार हॅण्ड पंप दुरुस्ती करणे विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.९ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला नगरसेविका सौ.सपना जयेश मोरे व सौ.प्रियांका अभिजित मोरे यांचा प्राप्त अर्जानुसार देहू गावातील हॅण्ड पंपाची पाहणी केली असता. देहू शहरात देहूगाव,विठ्ठलवाडी ,वाडाचामाळ व माळीनगर भागात हॅण्डपंप असून त्यातील काही मोडकळीस आले आहेत. तर काही बंद आढळून आले आहेत. सदर हॅण्ड पंप दुरुस्ती केल्यास त्याचा उपयोग येणाऱ्या वारकऱ्यांना / भाविक भक्त परिसरातील नागरिकांना होणार आहे. त्यामुळे सदर हॅण्ड पंप दुरुस्त करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

तरी सदर हॅण्ड पंप दुरुस्त करून सदर ठिकाणी इतर आवश्यकतेनुसार आवश्यक गोष्टी पुरवणे करिता येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे. अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ. सपना जयेश मोरे

अनुमोदक :- सौ. प्रियांका अभिजित मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.१० :- विद्युत व इतर विभागाकरिता लागणाऱ्या वाहनासाठी इंधन व वाहन दुरुस्ती साठी वार्षिक निविदा करणे विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.१० :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.देहू नगरपंचायत हद्दीतल एकूण १६००विजेचे असुन एकूण ३० हायमास्ट आहे. त्यांची देखभाल दुरुस्ती नगरपंचायतीच्या विद्युत विभागा मार्फत केली जाते.त्यासाठी नगरपंचायतीकडे शिडी लावलेले वाहन नसल्याने एक छोटा हत्ती गाडी शिडी वाहून नेण्यासाठी वापरण्यात येतो.त्यासाठी इंधन व वाहन दुरुस्तीची वार्षिक निविदा करण्यात यावी.

अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सुधीर सुरेश काळोखे
अनुमोदक :- प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.११:- अस्थी विसर्जनासाठी व निर्माल्य टाकणासाठी नदी घाट परिसारत अस्थी /निर्माल्य कुंड उभारनेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.११:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला असता देहू ही श्री.संत तुकाराम महाराजांची जन्म भूमी असल्याने येथे वर्षातून तीन (आषाढी यात्रा, कार्तिकी यात्रा ,संत तुकाराम महाराज बीज सोहळा) मोठ्या यात्रा भरत असतात तसेच इतरही संस्कृती कार्यक्रम होत असतात. त्या त्यामुळे हजरो भाविक भक्त येथे दर्शनासाठी येत असतात दररोज घाट परिसरावर नागरिकांची /गर्दी असते. तीर्थक्षेत्र असल्याने देहू शहरातील तसेच लगतच्या परिसरातील लोक येथे अस्थी विसर्जनासाठी येतात. परिसरातील नागरिक इंद्रायची नदी पात्रात घरगुती कार्यक्रमाचे निर्माल्यही टाकता आल्याचे निदर्शनास आले आहे.

**येथे** येणारे भाविक इंद्रायणी नदीचे पाणी तीर्थ म्हणून घेत असतात.त्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या व घाट परिसर स्वच्छतेसाठी घाट परिसरात अस्थी विसर्जनासाठी व निर्माल्य टाकणासाठी कुंड उभारण्यात यावे.

घाट परिसर स्वच्छतेसाठी तसेच नदीचे पावित्र्य राखण्यासाठी व येणाऱ्या भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने इंद्रायणी नदी घाट परिसारत अस्थी /निर्माल्य कुंड उभारने गरजेचे आहे.अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- योगेश ह. काळोखे

अनुमोदक :- शितल ह. हगवणे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा
(तहकूब सभा)

विषय क्रमांक - 12
दिनांक -29/08/2022

ठराव क्रमांक – 12
दिनांक -23/09/2022

देहू नगरपंचायत हद्दीतील चव्हाण नगर येथील पिण्याच्या पाण्याची HDPE पाईपलाईन चे काम नगरपंचायतने हाती घेतले होते सदर कामाची ई निविदा करून मे सागर घोरपडे, देहूरोड यांना ५.२३ % कमी या वाजवी दराने प्राप्त झाली होती. मे सागर घोरपडे यांनी काम चालू केले असता जुनी मेन कनेक्शन पाईपलाईनची खोली कमी असल्याने क्रॉसिंग कामी HDPE पाईप वापरल्यास पाईपलाईन लिकेज होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सदर ठिकाणी १०० mm DI पाईप वापरनेस सोयीचे असल्याने, १०० mm DI पाईपलाईन चे अंदाजपत्रक तयार केले असता रक्कम रु १,०८,४७०/- इतका खर्च अपेक्षित आहे. देहू नगरपंचायत हद्दीतील चव्हाण नगर वॉर्ड क्र-९ येथे HDPE पाईपलाईन टाकणे हे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्याने तसेच कामातील प्रमाण शिल्लक असल्याने या अतिरिक्त कामाचा खर्च सदरच्या निविदेतून करणेस व कामाचे बिल मे सागर घोरपडे, देहूरोड यांना अदा करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सदर कामाचा खर्च सण २०२२-२३ नगरपंचायत फंडातून या लेखा शिर्षातून करण्यात यावा .

सूचक : पुनम काळोखे

अनूमोदक : पौर्णिमा बि. परदेशी

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.१३ :- देहू नगरपंचायत हद्दीतील जुन्या झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईनचा आधुनिक पद्धतीने सर्वे करून घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.१३:- देहू नगरपंचायत हद्दीतील वितरण नलिकेचे जाळे मोठे विस्तारित आहे. सद्य स्थितीत जुन्या लाईनच्या जाळ्याची पूर्णपणे माहिती नसले कारणी काही भागातील पाणीपुरवठा सुरळीत होत नाही. त्यामुळे पाणीपुरवठा विभागातील जुन्या पाईपलाईनचा सर्वे करून मॅप तयार करून घेणे आवश्यक आहे. या सर्वे मध्ये बोडकेवाडी जलशुद्धीकरणापासून देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व बैठी पाण्याच्या टाक्या तसेच उंच टाक्या यांपासून संपूर्ण वितरण नलिकांची माहिती घेणे तसेच झोन पद्धतीने नकाशे बनवणे या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता रक्कम रु ३,००,०००/-ला हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस, निविदा मागवणेत यावी.अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- योगेश ह. काळोखे

अनुमोदक :- सुधिर सु काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा
(तहकूब सभा)

विषय क्रमांक -14
दिनांक -29/08/2022

ठराव क्रमांक - 14
दिनांक - 23/09/2022

देहू नगरपंचायत हद्दीतील सरकारी गायरान विठ्ठलवाडी येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीला वॉल कंपाऊंड करणे कामी नगरपरिषद अभियंता , देहू नगर पंचायत यांचा अहवाल व त्यावरील मा . मुख्यधिकारी यांची शिफारस पाहण्यात आली .

देहू नगरपंचायत हद्दीतील सरकारी गायरान विठ्ठलवाडी येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीला वॉल कंपाऊंड करणे संरक्षण कारणास्तव करणे गरजेचे आहे.तरी सदर ठिकाणी तार कंपाऊंड करणे व त्याला चैन लिंक फेन्सिंग करणे या कामाला ला हिं सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस, निविदा मागवणेस व या कामी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे.

सदर कामाचा खर्च सण 2022-23 नगरपंचायत फंडातून या लेखा शिर्षातून करण्यात यावा .

सूचक : शितल अ. हगवणे

अनूमोदक : मयुर द. शिवशरण

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.१५ :- देहू नगरपंचायत हदीतील महाराष्ट्र जिवन प्राधिकरण काळात बंद केलेल्या नळ कनेक्शन धारकांना पाणीपट्टी कमी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.१५ :- देहू शहरा करता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत संपूर्ण शहरात पाणीपुरवठा पाईपलाईन व प्रक्रिया केंद्र यांचे काम पूर्ण करून देहू ग्रामपंचायतीकडे २०१९ आली हस्तांतरित करण्यात आले.सदर हस्तांतरण करत असताना आवश्यक दस्तऐवज देहु ग्रामपंचायतकडे वर्गी करण्यात आले परंतु बऱ्याच नळ धारकांची माहिती देण्यात आलेली नसल्याची आढळून येते. देहुतील विविध प्रभागांमध्ये नागरिकांकडून नळ कनेक्शन देण्यात आले आहेत परंतु प्रत्यक्षात पाणीपुरवठा करण्यात आलेला नाही तसेच मागील दोन वर्षापासून वारंवार देहू ग्रामपंचायतीकडून/ नगरपंचायतीकडून प्राप्त होत आहेत अशा स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. मानवत ज्या नळ धारकांना पाणीपुरवठा अद्याप केलेला नाही अथवा नळ कनेक्शन अध्यायातील नाही यांच्याकडून बिल माफ करण्यासंदर्भात अर्ज प्राप्त झालेले आहेत अशी माहिती सभागृह देण्यात आली.

सदर विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा झाली त्यानंतर यासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे पत्र व्यवहार करून काही माहिती उपलब्ध होते का याची माहिती घ्यावी तसेच प्रत्यक्ष स्थळ पाणी करून व कागदपत्र उपलब्ध असल्यास अशा लोकांची पाणीपट्टी वसूल करण्यात येऊ नये असा ठराव सर्वांमध्ये संमत करण्यात आला.

सुचक :- श्री.सुधीर सुरेश काळोखे

अनुमोदक :- श्री. प्रविण रामदास काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

देहू नगरपंचायत
मा. सर्वसाधारण सभा
(तहकूब सभा)

विषय क्रमांक - 16
दिनांक -29/08/2022

ठराव क्रमांक - 16
दिनांक -23/09/2022

देहू नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्र. १६ मधील सावतामाळी मंदिर शेजारील भागातील जुनी GI पाईपलाईन पूर्णपणे गंजल्यामुळे सावतामाळी मंदिर परिसरात पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याने नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत होत्या. तरी सदरच्या ठिकाणी १०० MM DI पाईप लाईन पूर्वी टाकून ठेवली होती तिचे मेन लाईनला कनेक्शन केले नसल्याने ती चालू करण्यात आली नव्हती.कनेक्शन चे काम पूर्ण झाल्यास सावतामाळी मंदिर परिसरातील पाणी टंचाईचा प्रश्न मार्गी लागणार आहे. तरी सदरचे पाईपलाईनचे कनेक्शन व त्या अनुषंगाने बाकीची कामे करण्याचे कामाचे अंदाज पत्रक रक्कम रुपये 1,30,505/-ला हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस, निविदा मागवणेस व या कामी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे.

सदर कामाचा खर्च सण २०२२-२३ नगरपंचायत फंडातून या लेखा शिर्षातून करण्यात यावा .

सूचक: योगेश बा. परंडवाल

अनूमोदक: आदित्य नि. टिळेकर

[signature]

Scanned with OKEN Scanner

विषय क्र.१७ :- देहू नगरपंचायत हद्दीतील शाळेभोवती, मंदिर परिसरातील तसेच वाढलेले गवत कमी करणे करीत तणनाशक फवारणी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.१७ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू ही श्री संत तुकाराम महाराजांची जन्म भूमी असल्याने येथे वर्षातून तीन (आषाढी यात्रा, कार्तिकी यात्रा ,संत तुकाराम महाराज बीज सोहळा) मोठ्या यात्रा भरत असतात. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये पावसाच्या मोठया प्रमाणात जागो-जागी गवत वाढलेले अढळून आले येते.मुख्य मंदिर परिसर,शहरातील शाळा परिसर ,रस्त्याच्या कडेचे फुटपाथ तसेच ओढ्या नाल्यावरील गवत वाढले असल्याने ते काढणेकामी शहरातील नागरिकांच्या व पालकांच्या तक्रारी येत असून गवत काढणे आवश्यक आहे. गवत वाढीमुळे साथीचे रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने ते कमी करणे करिता आवश्यकतेनुसार आवश्यक ठिकाणचे गवत काढणे व तन नाशक फवारणी करणे गरजेचे आहे. तरी सदर कामा करिता अंदाजे ७,००,०००/- रु खर्च येणार असून.तरी सदर येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे. अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ. रसिका स्वप्निल काळोखे

अनुमोदक :- श्री. सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

विषय क्र.१८:- देहू नगरपंचायत सरकारी गायरान हद्दीत व्यक्ती व प्राणी यांच्या डेड बॉडी दफन करणेसाठी विरोध करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र.१८ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत मौजे विठ्ठलवाडी सरकारी गायरान परिसरात बाहेरील व्यक्ती बेकायदेशीर रित्या व्यक्ती व प्राणी यांच्या डेड बॉडी दफन करत आहे अशा तक्रारी नगरपंचायत कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत त्यामुळे गायरानातील जागा निश्चीत करण्यात यावी व त्या ठिकाणीच विधी करण्यात यावा.देहू नगरपंचायतीची पूर्व परवानगी घेऊनच विधी करण्यात यावा. बेकायदेशीर रित्या व्यक्ती व प्राणी यांच्या डेड बॉडी दफन केल्यास गुन्हा दाखल करण्यात यावा. या आशयाचा बोर्ड सदर ठिकाणी लावणे यावा . अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- सौ. रसिका स्वप्निल काळोखे

अनुमोदक :- श्री. सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
दिनांक . २३.०९.२०२२ रोजीची तहकुब सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner